दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | गुरुवार, दि. २१ मे, २०२६ | वर्ष - १ | अंक - २३५ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

गुरुवार, दि. २१ मे २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, ग्रीष्म ऋतु, अधिक ज्येष्ठ मास, शुक्लपक्ष, पंचमी सकाळी ८-२७ पर्यंत नंतर षष्ठी तिथी, दिवस नक्षत्र- पुष्य रात्री २-५० पर्यंत नंतर आश्लेषा, चंद्र रास- कर्क, सूर्य रास - वृषभ, गुरु रास - मिथुन
आज गुरुपुष्यामृत योग आहे

### केरळमध्ये मान्सून २६ तारखेला

**पिंपरी** : शनिवारी अनुकूल स्थितीमुळे मान्सूनचा वेग वाढत असून, अल निनोचा प्रादुर्भाव झुगारून केरळमध्ये २६ मे रोजी मान्सून दाखल होणार आहे. असा अंदाज हवामानशास्त्र विभागाने वर्तविला आहे. मान्सून सध्या अंदमान,निकोबार बेटांसह बंगालचा उपसागर, अरबी समुद्राच्या काही भागात स्थिर होत आहे. दरम्यान मान्सून पुढे सरकण्यास सध्या अतिशय अनुकूल अशी स्थिती आहे. येत्या तीन ते चार दिवसात मान्सून अरबी समुद्रातील दक्षिण पूर्वेकडील बरासचा भाग व्यापणार आहे.

## सारांश वृत्त

### चंद्राबाबू नायडूंची गंगम्मा मंदिराला भेट

**कुप्पम (आंध्रप्रदेश) :** आंध्र प्रदेशाचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी बुधवारी चित्तूर जिल्ह्यातील प्रसन्ना गंगम्मा मंदिरात पूजा केली. त्यांच्या पत्नी एन. भुवनेश्वरी यांच्यासमवेत मुख्यमंत्र्यांनी देवतेला रेशमी वस्त्रे अर्पण केली. मुख्यमंत्री आणि त्यांच्या पत्नीने प्रसन्ना तिरुपती गंगम्मा यांना रेशमी कपडे आणि तिरुमला व्यंकटेश्वर स्वामी प्रसादम भेट दिला

### 'रत्न भंडार' सूचीकरणाचे काम सुरू

**पुरी :** येथील जगन्नाथ मंदिरातील 'रत्न भंडार' अर्थात मंदिराच्या खजिन्यातील दागिने आणि मौल्यवान वस्तूंच्या सूचीकरणाचे काम आठवडाभराच्या विश्रांतीनंतर मंगळवारी पुन्हा सुरू करण्यात आले. कडक सुरक्षा व्यवस्था आणि ओडिशा सरकारने मंजूर केलेल्या मानक कार्यपद्धतीनुसार (एसओपी) हे काम सुरू असल्याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. मंदिरातील 'रत्न भंडार'मधील दागिने व मौल्यवान वस्तूंची तपासणी आणि नोंदणी प्रक्रिया यावर्षी २५ मार्चपासून तब्बल ४८ वर्षांनंतर सुरू करण्यात आली होती.

### तृणमूल काँग्रेस फुटीच्या उंबरठ्यावर?

**कोलकाता :** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर तृणमूल काँग्रेसमध्ये अंतर्गत मतभेद आणि संभाव्य फुटीच्या चर्चांना वेग आला आहे. पक्षाच्या आंदोलनात अनेक आमदार गैरहजर राहिल्याने नव्या चर्चांना तोंड फुटले आहे. नेतृत्व बदलल्यानंतर झालेल्या आंदोलनात आमदारांची कमी उपस्थिती ही संघटनात्मक आव्हानांची झलक मानली जात आहे.

### ८ हजार कर्मचाऱ्यांना केले कामावरून कमी

# मेटाकडून अचानक कर्मचारी कपात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीची कंपनी असलेल्या 'मेटा'ने मोठ्या प्रमाणावर कर्मचारी कपात करत सुमारे ८ हजार कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केले आहे. ही संख्या कंपनीच्या एकूण कर्मचाऱ्यांच्या जवळपास १० टक्के इतकी आहे. विशेष म्हणजे, कर्मचाऱ्यांना आधी घरातून काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या आणि त्यानंतर पहाटे ई-मेलद्वारे नोकरी संपुष्टात आल्याची माहिती देण्यात आली.

कंपनीने ही प्रक्रिया अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने राबवली. सिंगापूरमधील कर्मचाऱ्यांना पहाटे ४ वाजता, तर भारतीय वेळेनुसार पहाटे १.३० वाजता ई-मेल प्राप्त




झाले. कार्यालयात गोंधळ किंवा संतापाची परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी कर्मचाऱ्यांना कार्यालयात न बोलावता घरातूनच काम करण्यास सांगण्यात आले होते. कंपनीने या निर्णयामागे कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात 'एआय'ला दिलेले प्राधान्य हे प्रमुख कारण असल्याचे स्पष्ट केले आहे. 'मेटा' आता 'एआय-नेटिव्ह' टीम्स उभारण्यावर भर देत असून, सुमारे ७ हजार कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्यांमध्ये बदल करण्यात येणार आहे. तसेच ६ हजार रिक्त पदांची भरती प्रक्रिया स्थगित करण्यात आली आहे. कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी मार्क झकरबर्ग यांनी एआय तंत्रज्ञानासाठी यंदा १२५ ते १४५ अब्ज डॉलर खर्च करण्याची योजना आखली आहे.

या कपातीच्या चर्चेमुळे कंपनीतील वातावरण काही दिवसांपासून तणावपूर्ण बनले होते. काही कर्मचाऱ्यांनी कंपनी सोडण्यापूर्वी कार्यालयातील मोफत सुविधा आणि साहित्य गोळा करण्यास सुरुवात केल्याची माहिती समोर आली आहे. याचदरम्यान, कर्मचाऱ्यांच्या संगणकावरील माऊस हालचालींवर नजर ठेवणारे नवे सॉफ्टवेअर कंपनीने लागू केल्याने नाराजी वाढली असून, हजारहून अधिक कर्मचाऱ्यांनी त्याला विरोध दर्शवला आहे.

तंत्रज्ञान क्षेत्रातील कर्मचारी कपातीची ही लाट केवळ 'मेटा'पुरती मर्यादित नसल्याचे दिसत आहे. गेल्या आठवड्यात 'सिस्को सिस्टम्स'ने ४ हजार कर्मचाऱ्यांना कमी केले. त्याआधी 'मायक्रोसॉफ्ट', 'अॅमेझॉन', 'डिस्ने' आणि 'ओरॅकल' यांसारख्या कंपन्यांनीही मोठ्या प्रमाणावर कर्मचारी कपात केली होती. 'ओरॅकल'ने तर जगभरातील २० ते ३० हजार कर्मचाऱ्यांना ई-मेलद्वारे कामावरून कमी केल्याचे वृत्त आहे.

'रेड्डू क्यू'चे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपल दत्ता यांच्या मते, तंत्रज्ञान क्षेत्रात सुरू असलेला हा बदल तात्पुरता नसून व्यापक रचनात्मक फेरबदलाचा भाग आहे. भविष्यात कंपन्यांना केवळ पारंपरिक काम करणारे कर्मचारी नको असून, एआय आणि जटिल तांत्रिक प्रणाली हाताळू शकणाऱ्या कुशल व्यावसायिकांची अधिक गरज भासणार आहे.

# विलिनीकरणाच्या चर्चांना राष्ट्रवादीचा पूर्णविराम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलिनीकरणाच्या चर्चांदरम्यान खासदार सुप्रिया सुळे यांनी पक्षाची भूमिका स्पष्ट करत सध्या कोणत्याही प्रकारचे विलिनीकरण विचाराधीन नसल्याचे सांगितले. वाय. बी. चव्हाण सेंटर येथे झालेल्या शरद पवार गटाच्या बैठकीत या विषयावर सविस्तर चर्चा झाली.

गेल्या काही दिवसांपासून अजित पवार गटातील काही आमदार शरद पवार यांच्या संपर्कात असल्याच्या चर्चेमुळे राज्याच्या राजकारणात हालचालींना वेग आला आहे. बैठकीत उपस्थित आमदारांनी विलीनीकरणाच्या चर्चांमुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण होत असल्याची भावना नेतृत्वासमोर मांडली. यावेळी सुप्रिया सुळे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, पक्षाच्या विलिनीकरणाबाबत कोणतीही चर्चा सुरू नाही. पक्षाला स्वतःच्या बळावर अधिक मजबूत करणे आणि संघटना वाढवणे हेच सध्याचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनीही याच भूमिकेची पुनरावृत्ती केली.

अजित पवार गटातील अस्वस्थतेचाही मुद्दा बैठकीत चर्चेत होता. माहितीनुसार, सत्ताधारी गटातील सुमारे २२ आमदार शरद पवार यांच्या संपर्कात असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. योग्य वेळेची प्रतीक्षा करत हे आमदार पुढील भूमिका ठरवतील, अशीही चर्चा रंगली आहे. सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांनी शरद पवार यांची घेतलेली भेट आणि त्यानंतर वाढलेल्या चर्चांमुळे नाराजीचे वातावरण असल्याचे बोलले जात आहे.

# वांद्रे अतिक्रमण हटाव मोहिमेला विरोध

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** वांद्रे रेल्वे स्थानक परिसरातील अतिक्रमण हटवण्याच्या कारवाईदरम्यान तणाव निर्माण झाला असून स्थानिक नागरिकांनी विरोध दर्शवत पोलिसांवर बाटल्या फेकल्याची घटना घडली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना सौम्य लाठीचार्ज करावा लागला.

काही दिवसांपूर्वी एका परदेशी ब्लॉगरने वांद्रे रेल्वे स्थानकाजवळील झोपडपट्ट्यांचा व्हिडीओ सोशल मीडियावर पोस्ट केला होता. त्यानंतर या प्रश्नाकडे व्यापक लक्ष वेधले गेले. रेल्वे प्रशासनाने त्यानंतर अतिक्रमण हटवण्याची मोहीम हाती घेतली असून रेल्वे सुरक्षा बल आणि जीआरपीच्या मदतीने कारवाई केली जात आहे.

वांद्रे स्थानक परिसरातील पश्चिम रेल्वेच्या जागेवर मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे आणि झोपडपट्ट्यांचे अतिक्रमण झाले होते. रेल्वे रुळांलगतच झोपड्या उभारण्यात आल्याने प्रवाशांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला होता. यापूर्वी २७ नोव्हेंबर २०१७ रोजी अतिक्रमण हटवण्याचे आदेश देण्यात आले होते. गेल्या नऊ वर्षांपासून या विषयावर मुंबई उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू होती. अखेर २९ एप्रिल २०२६ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने अतिक्रमण हटवण्यास परवानगी दिल्यानंतर पश्चिम रेल्वेने मोठ्या प्रमाणावर कारवाई सुरू केली.

### अमेरिकी काँग्रेसने घातली मनमानीला वेसण

# ट्रम्प यांच्या लष्करी अधिकारांवर मर्यादा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वॉशिंग्टन :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या लष्करी अधिकारांवर मर्यादा आणणारा महत्त्वाचा ठराव अमेरिकन काँग्रेसमध्ये मंजूर करण्यात आला आहे. या मतदानात चार रिपब्लिकन खासदारांनी डेमोक्रॅटिक पक्षाला पाठिंबा दिला, तर तिघांनी मतदानात भाग घेतला नाही. ठरावाला ५० विरुद्ध ४७ मतांनी मंजुरी मिळाली. मात्र, त्याचे कायद्यात रूपांतर होण्यासाठी अजून अनेक घटनात्मक टप्पे पार करावे लागणार आहेत.

हा ठराव कायद्यात रूपांतरित झाल्यास ट्रम्प प्रशासनाला इराणविरोधातील कोणतीही



लष्करी कारवाई सुरू ठेवण्यासाठी काँग्रेसची मंजुरी घेणे बंधनकारक ठरेल. सध्या या प्रस्तावावरील अंतिम मतदान सिनेटमध्ये बाकी असून त्यानंतर रिपब्लिकन बहुमत असलेल्या प्रतिनिधीगृहाची मंजुरी आवश्यक असेल. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांना या विधेयकावर नकाराधिकार वापरण्याचा अधिकार आहे. तो नकाराधिकार रद्द करण्यासाठी सिनेट आणि प्रतिनिधीगृह या दोन्ही सभागृहांमध्ये दोन-तृतीयांश बहुमत आवश्यक असणार आहे. त्यामुळे या ठरावाचे प्रत्यक्ष कायद्यात रूपांतर होणे सध्या कठीण मानले जात आहे.

युद्ध सुरू करण्याचा अधिकार संसदेकडे असावा, असा मुद्दा मांडत डेमोक्रॅटिक पक्षाने या ठरावासाठी जोरदार भूमिका घेतली. अमेरिकेच्या संविधानानुसार युद्ध घोषित करण्याचा अधिकार काँग्रेसकडे असल्याचे विरोधकांनी अधोरेखित केले. हा प्रस्ताव व्हर्जिनियाचे डेमोक्रॅटिक सिनेटर टिम केन यांनी मांडला होता.

चर्चेदरम्यान टिम केन यांनी सांगितले की, अमेरिकेने युद्धासारखा गंभीर निर्णय घेण्यापूर्वी राष्ट्राध्यक्षांनी काँग्रेससमोर भूमिका स्पष्ट करणे आवश्यक आहे. केवळ राष्ट्राध्यक्षांनाच नव्हे, तर काँग्रेसलाही युद्ध सुरू करण्याचा घटनात्मक अधिकार असल्याचे त्यांनी नमूद केले.

व्हाईट हाऊसने मात्र ट्रम्प प्रशासनाची भूमिका योग्य असल्याचा दावा केला आहे. अमेरिकेच्या सुरक्षेसाठी आवश्यक त्या अधिकारांच्या चौकटीत राहूनच कारवाई करण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. राष्ट्राध्यक्ष काँग्रेसच्या मंजुरीशिवाय केवळ ६० दिवसांपर्यंत लष्करी कारवाई सुरू ठेवू शकतात. त्यानंतर युद्ध थांबवणे, काँग्रेसची मंजुरी घेणे किंवा सैन्याच्या सुरक्षित माघारीसाठी अतिरिक्त ३० दिवसांची मुदत मागणे आवश्यक असते.

दरम्यान, अमेरिकी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी इराणवरील मोठा हल्ला तात्पुरता पुढे ढकलल्याचे सांगितले. कतार, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीने वाटाघाटींना संधी देण्यासाठी हा निर्णय घेण्याची विनंती केल्याचे त्यांनी म्हटले आहे.


### भाजपा १२, शिवसेनेला ३ तर राष्ट्रवादीला २ जागा

# विधान परिषदेसाठी महायुतीचे ठरले...

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १७ विधान परिषद जागांसाठी निवडणूक जाहीर केल्यानंतर महायुतीमध्ये जागावाटपावरून हालचालींना वेग आला आहे. विशेषतः कोकण स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ आणि पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघावरून मित्रपक्षांमध्ये रस्सीखेच सुरू असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

राज्यातील बदललेल्या राजकीय समीकरणांच्या



पार्श्वभूमीवर कोणत्या जागेवर कोणाचा दावा राहणार, यावरून महायुतीतील वरिष्ठ नेत्यांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सदस्य संख्येच्या आधारे प्राथमिक स्तरावर जागावाटपाचे गणित मांडले जात असून ज्या पक्षाचे संख्याबळ अधिक असेल, त्या पक्षाकडून संबंधित जागेवर दावा केला जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. प्राथमिक चर्चेनुसार भाजपच्या वाट्याला १२ जागा, शिवसेनेच्या वाट्याला ३ जागा, तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला २ जागा येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

महायुतीच्या समन्वय समितीमध्ये लवकरच जागावाटपावर सविस्तर चर्चा होणार असून काही जागांवर मित्रपक्षांमध्ये अदलाबदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या बैठकीत अंतिम निर्णय घेतला जाणार असल्याचे समजते. पुढील आठवडाभरात जागावाटपावर महायुतीत एकमत होण्याची शक्यता आहे.

प्राथमिक चर्चेनुसार भाजपने नागपूर, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर-जालना, सातारा-सांगली, पुणे, जळगाव, नांदेड, भंडारा-गोंदिया, अमरावती, लातूर-धाराशीव-बीड आणि सोलापूर या जागांवर दावा केला आहे. शिवसेनेकडून ठाणे, नाशिक आणि यवतमाळ या मतदारसंघांवर दावा करण्यात आला आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेसने रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग आणि हिंगोली-परभणी या जागांवर दावा कायम ठेवला आहे.

### बंगालमधील मुस्लिम आरक्षण रद्द

**कोलकाता :** पश्चिम बंगालमधील सुवेंदू अधिकारी सरकारने ओबीसी आरक्षणाच्या यादीत आणि नियमांमध्ये मोठे बदल केले आहेत. या निर्णयानुसार राज्यातील ओबीसी आरक्षण १७ टक्क्यांवरून कमी करून ७ टक्के करण्यात आले आहे. या निर्णयामुळे मुस्लिम समाजासाठी असलेले ओबीसी आरक्षण पूर्णपणे रद्द झाले आहे. पश्चिम बंगालच्या नव्या मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय २०२४ मध्ये आलेल्या कलकत्ता उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर घेण्यात आला आहे. राज्यात केवळ ७ टक्के ओबीसी आरक्षण वैध राहील, असे न्यायालयाने म्हटले होते.

# मुंबई-विजयदुर्ग रो-रो सेवा अखेर बंद

### अल्प प्रतिसादामुळे सरकारची कोंडी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** मोठ्या गाजावाजात सुरू करण्यात आलेली मुंबई-विजयदुर्ग रो-रो सेवा अखेर अनिश्चित काळासाठी बंद करण्यात आली आहे. तांत्रिक बिघाडाचे कारण पुढे करत ही सेवा स्थगित करण्यात आली असली, तरी सुरुवातीपासूनच अल्प प्रतिसाद आणि वाढत्या तोट्यामुळे हा प्रकल्प अडचणीत सापडल्याची चर्चा सुरू आहे.

कोकणातील प्रवास सुलभ करण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने ही सेवा सुरू केली होती. मात्र, अपेक्षित प्रवासी प्रतिसाद न मिळाल्याने प्रकल्प आर्थिकदृष्ट्या तोट्यात गेला. तरीही काही मंत्र्यांच्या आग्रहामुळे ही सेवा सुरू ठेवण्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. या सेवेत मुंबई-विजयदुर्गदरम्यान एकूण १२ फेऱ्या पार पडल्या. त्यामध्ये केवळ ८९४ प्रवासी आणि १५४ वाहनांची वाहतूक झाली. काही फेऱ्यांमध्ये जहाज जवळपास रिकामे धावल्याचेही समोर आले आहे.

तब्बल ६२० प्रवासी क्षमता असलेल्या जहाजात ५ मार्च रोजीच्या विजयदुर्ग-मुंबई फेरीत एकही प्रवासी नव्हता. तर १९ मार्चच्या फेरीत केवळ एकच प्रवासी प्रवास करत होता. बहुतांश फेऱ्यांमध्ये प्रवाशांची संख्या ३० ते ४० च्या दरम्यान होती.

उद्घाटनाच्या पहिल्या फेरीत ४१३ प्रवासी असल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र त्यानंतर प्रतिसाद सातत्याने घटत गेला. या सेवेसाठी 'इकोनॉमी' वर्गाचे तिकीट दर सुमारे ३ हजार रुपयांपासून सुरू होत होते.

सर्व प्रवाशांनी किमान तिकीट दर भरला आणि वाहनांच्या वाहतुकीचे भाडे गृहीत धरले तरी एकूण उत्पन्न ३५ ते ३६ लाख रुपयांच्या आसपास असल्याचा अंदाज आहे. एका फेरीसाठी १८ ते २० हजार लिटर इंधन लागत होते.

### विदर्भात तापमान ४६ अंशांच्या पुढे

# संपूर्ण राज्य उष्णतेने अक्षरशः होरपळले...

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्रात पुन्हा एकदा उष्णतेची तीव्र लाट उसळली असून विदर्भ आणि मराठवाड्यात तापमानाने विक्रमी पातळी गाठली आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये तापमान ४५ अंश सेल्सिअसच्या पुढे गेले असून काही ठिकाणी ४६ अंशांचाही टप्पा ओलांडला आहे. वाढत्या उष्णतेमुळे नागरिक हैराण झाले असून भारतीय हवामान विभागाने अत्यावश्यक कामाशिवाय दुपारच्या वेळेत घराबाहेर न पडण्याचा सल्ला दिला आहे.
दरम्यान, जूनच्या दुसऱ्या आठवड्यात मान्सून विदर्भात दाखल होण्याची शक्यता हवामान




विभागाने व्यक्त केली आहे. मात्र, तोपर्यंत नागरिकांना उष्णतेच्या तीव्र लाटेचा सामना करावा लागणार आहे.
नागपूरसह संपूर्ण विदर्भात पुढील आठवडाभर उष्णतेची लाट कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. अकोला, अमरावती, वर्धा आणि नागपूर जिल्ह्यांसाठी 'हाय अलर्ट' जारी करण्यात आला आहे. नागपूरमध्ये तापमानाचा पारा तब्बल ४५.५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचला आहे. उष्णतेसोबतच उकाडाही वाढल्याने नागरिकांना घराबाहेर पडणे कठीण झाले आहे.
उष्माघाताचा धोका वाढल्याने विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मंगळवारी विदर्भातील तीन जिल्ह्यांमध्ये तापमान ४६ अंशांवर पोहोचले, तर आणखी तीन जिल्ह्यांमध्ये तापमान ४५ अंशांच्या पुढे गेले होते.
वर्धा जिल्ह्यात सलग दुसऱ्या दिवशी ४६.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.
सकाळपासूनच कडक उन्हाच्या झळा जाणवत असून दुपारी परिस्थिती अधिक गंभीर होत आहे. वाढत्या उष्णतेमुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि मैदानी काम करणाऱ्यांनी विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.
मुंबईतही उष्ण आणि दमट हवामानामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. हवामान खात्याच्या अंदाजानुसार मुंबईतील कमाल तापमान ३५ अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याची शक्यता आहे. आर्द्रतेचे प्रमाण ७५ टक्क्यांपर्यंत पोहोचत असल्याने "उष्ण आणि दमट" वातावरणामुळे उकाडा अधिक जाणवत आहे.
मुंबई, उपनगर आणि ठाणे परिसरात सकाळपासूनच घाम आणि अस्वस्थतेचा त्रास वाढला आहे. समुद्रकिनारी भागात दमट वारे वाहत असल्याने उष्णतेचा प्रभाव अधिक तीव्र झाला आहे. काही भागांत ढगाळ वातावरण आणि हलक्या पावसाच्या सरींचा अंदाज वर्तवण्यात आला असला तरी त्यातून फारसा दिलासा मिळण्याची शक्यता नसल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे. हवामान विभागाने नागरिकांना भरपूर पाणी पिणे, हलके आणि सैल कपडे वापरणे तसेच दीर्घकाळ उन्हात न राहण्याचा सल्ला दिला आहे. पुढील काही दिवस राज्यभर उष्णतेचा तडाखा कायम राहण्याची शक्यता असल्याने प्रशासनही सतर्क झाले आहे.

# पिंपरी-चिंचवडच्या महापौरांना जीवे मारण्याची धमकी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार समोर आला असून शहरात खळबळ उडाली आहे. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या 'समाधान हेल्पलाईन'वर फोन करून एका व्यक्तीने ही धमकी दिली होती. पोलिसांनी तत्काळ तपास सुरू करत संबंधित व्यक्तीला ताब्यात घेतले.

तपासात आशिष जामदाडे-पाटील असे धमकी देणाऱ्या व्यक्तीचे नाव समोर आले आहे. तो मूळचा अहमदनगर जिल्ह्यातील असून सध्या चिखली परिसरात वास्तव्यास आहे. भोसरी एमआयडीसी परिसरात तो सुरक्षा रक्षक म्हणून काम करत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. पोलिसांच्या माहितीनुसार, संबंधित व्यक्तीने हेल्पलाईनवर फोन करून "मी रवी लांडगे यांना मारून टाकणार आहे," अशी धमकी दिली होती. त्यानंतर पोलिसांनी त्याचा शोध घेत चौकशी केली. चौकशीत संबंधित तरुण मानसिक तणावाखाली असल्याचे आढळून आले.

महापौर रवी लांडगे यांनी सांगितले की, ही व्यक्ती त्यांना पूर्वीपासून ओळखीची होती. सुमारे दोन वर्षांपूर्वी तो दोन वेळा घरी भेटायला आला होता. अनेक वेळा तो भेटला होता. आजीच्या निधनानंतर तेराव्याच्या कार्यक्रमालाही तो उपस्थित राहिला होता. त्यावेळी त्याने एक पुस्तक भेट दिले होते. त्यामुळे त्याच्याकडून अशा प्रकारची धमकी दिली जाईल, अशी अपेक्षा नव्हती, असे लांडगे यांनी म्हटले आहे.

# संपादकीय

## देशांतर्गत वित्तीय वादळ



**मध्यपूर्वेतील युद्धामुळे जागतिक अर्थव्यवस्था हादरली असताना, भारतासमोर आता एक वेगळेच आणि अधिक भयंकर संकट उभे राहिले आहे. हे संकट परकीय नसून, देशांतर्गत वित्तीय तूट आणि वाढत्या अनुदानाच्या ओझ्यातून निर्माण झालेले आहे. आगामी काळात हे आर्थिक वादळ केंद्र आणि राज्य सरकारांची मोठी कसोटी पाहणार आहे.**

सध्या देशात आणि जगात इराणमधील संघर्ष, कच्च्या तेलाचे भडकलेले दर आणि त्यामुळे निर्माण झालेल्या महागाईचीच चर्चा सुरू आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर ११० डॉलर्स प्रति बॅरलच्या पुढे गेले आहेत, तर दुसरीकडे भारतीय रुपयाने प्रति डॉलर ९६.५ ची नीचांकी पातळी गाठली आहे. या बाह्य धक्क्यांचे परिणाम आता देशाच्या तिजोरीवर अत्यंत गंभीर रूपात उमटू लागले आहेत. एका अहवालानुसार, भारताला सध्या जितका धोका बाह्य घटकांचा आहे, त्याहून अधिक मोठा धोका देशांतर्गत वित्तीय शिस्तीला बसत असलेल्या धक्क्यांचा आहे. हा धोका साधासुधा नसून, तो देशाच्या विकासाचा वेग रोखणारा आणि अर्थव्यवस्थेला खोल गर्तेत ढकलणारा ठरू शकतो. कच्च्या तेलाचे आणि नैसर्गिक वायूचे दर वाढल्याचा थेट परिणाम खतांच्या आणि इंधनाच्या किमतीवर होतो. देशातील शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेला महागाईच्या झळांपासून वाचवण्यासाठी सरकारला खतांवरील अनुदान मोठ्या प्रमाणावर वाढवावे लागेल. यासोबतच, इंधनाचे दर नियंत्रणात ठेवण्यासाठी पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात कपात करणे अपरिहार्य ठरेल. याशिवाय युद्धामुळे अडचणीत आलेल्या विमान वाहतूक कंपन्या, निर्यातदार आणि लघु व मध्यम उद्योगांना सावरण्यासाठी आपत्कालीन पतहमी योजनांचा विस्तार करावा लागेल. या सर्व उपाययोजनांचा थेट बोजा सरकारच्या तिजोरीवर पडणार आहे. परिणामी, केंद्र सरकारची वित्तीय तूट म्हणजेच सरकारचा एकूण खर्च आणि उत्पन्न यातील तफावत देशाच्या एकूण उत्पन्नाच्या ५ टक्क्यांच्या वर जाण्याची दाट शक्यता आहे. जेव्हा आंतरराष्ट्रीय बाजारात खतांच्या कच्च्या मालाचे दर वाढतात, तेव्हा त्याचा थेट फटका देशांतर्गत शेती क्षेत्राला बसतो. जर सरकारने हा बोजा स्वतःवर घेतला नाही, तर अन्नधान्याची महागाई भडकेल. पण हा बोजा घेतल्यास वित्तीय तूट वाढेल. वित्तीय तूट वाढणे म्हणजे देशाला अधिक कर्ज काढावे लागणे, ज्याचे व्याज चुकवताना भविष्यातील पिढ्यांवर आणि देशाच्या विकासावर मोठा आणि असह्य आर्थिक भार पडेल. हा आर्थिक फटका केंद्र सरकारपुरता मर्यादित नाही. देशातील अनेक राज्यांची आर्थिक स्थिती आधीच अत्यंत नाजूक आहे. अनेक राज्ये कर्जाच्या डोंगराखाली दबलेली आहेत. लोकप्रिय घोषणा आणि मोफत योजनांच्या ओझ्यामुळे राज्यांच्या तिजोरीत खडखडाट आहे. ही राज्ये स्वतःच्या खर्चासाठी केंद्राकडून मिळणाऱ्या करातील वाट्यावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहेत. इंधनावरील कर कमी केल्यामुळे केंद्राच्या महसुलात घट झाली, तर राज्यांना मिळणारा वाटाही आपोआप कमी होईल. दुसरीकडे, इंधनाचे दर वाढल्याने राज्यांना मिळणारा मूल्यवर्धित कर वाढू शकतो, परंतु महागाईमुळे इतर वस्तूंची आणि सेवांची मागणी घटल्यास एकूण कर संकलन वेगाने खाली येईल. अशा दुहेरी कोंडीत सापडलेल्या राज्यांना आपले दैनंदिन प्रशासकीय खर्च, कर्मचाऱ्यांचे पगार आणि निवृत्तीवेतन भागवणेही कठीण होऊन बसेल. जेव्हा जेव्हा सरकारसमोर खर्चाचा ताळमेळ बसवण्याचे संकट उभे राहते, तेव्हा सर्वात आधी भांडवली खर्चाला म्हणजेच रस्ते, रेल्वे, जलसिंचन आणि पूल बांधणीसारख्या पायाभूत सुविधांवरील खर्चाला कात्री लावली जाते. गेल्या काही वर्षांत भारतीय अर्थव्यवस्थेला सावरण्याचे काम सरकारने केलेल्या याच भांडवली खर्चाने केले आहे. केंद्र आणि राज्य सरकारांनी वित्तीय तूट भरून काढण्यासाठी या विकासकामांचा निधी रोखला, तर अर्थव्यवस्थेची वाढ थांबेल, रोजगार निर्मितीला फटका बसेल आणि बेरोजगारीचा प्रश्न अधिक भयंकर रूप धारण करेल. रुपयाची ऐतिहासिक घसरण हा या वित्तीय वादळाचा आणखी एक अत्यंत गंभीर पैलू. आपण आपल्या गरजेच्या ८५ टक्क्यांहून अधिक कच्चे तेल आणि ५० टक्क्यांहून अधिक नैसर्गिक वायू आयात करतो. रुपया कमकुवत झाल्यामुळे तेच तेल खरेदी करण्यासाठी आता आपल्याला हजारो कोटी रुपये अधिक मोजावे लागत आहेत. भारताची विदेशी गंगाजळी या प्रवाहाच्या विरोधात तग धरू शकेल, हा एक मोठा प्रश्नच आहे. निर्यात वाढवून परकीय चलन मिळवण्याचा मार्गही मंदीच्या सावटामुळे खडतर झाला आहे. या संकटावर मात करण्यासाठी सरकारने अत्यंत कडक अशा दीर्घकालीन आर्थिक शिस्तीला प्राधान्य दिले पाहिजे. बाह्य वादळे येतच राहतील आणि जातही राहतील, परंतु आपल्या अर्थव्यवस्थेचा डोलारा भक्कम ठेवणे ही सर्वस्वी आपलीच जबाबदारी आहे. हे वास्तव आता राजकीय नेतृत्वाने आणि धोरणकर्त्यांनी स्वीकारायलाच हवे.

# कृत्रिम बुद्धिमत्तेचे सायबर हल्ले आणि वित्तीय स्थिरता



सध्या जगभरात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्रांतीचे गोडवे गायले जात आहेत. ही नवीन प्रणाली मानवी जीवन सोपे करेल, उद्योगांची उत्पादकता वाढवेल असे दावे केले जात आहेत. पण याच तंत्रज्ञानाच्या नाण्याला एक अतिशय काळी आणि भयावह बाजू आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि वित्तीय संस्थांनी दिलेल्या इशाऱ्यानुसार, आता जगभरातील हॅकर्स आणि गुन्हेगारी टोळ्यांनी याच तंत्रज्ञानाचा वापर करून वित्तीय संस्थांवर हल्ले चढवण्यास सुरुवात केली आहे. पारंपरिक सायबर हल्ल्यांच्या तुलनेत हे नवे हल्ले हजारो पटींनी अधिक वेगवान, अचूक आणि गुंतागुंतीचे आहेत. हे हल्ले कोणत्याही सीमेवर लढले जात नाहीत, तर ते सर्व्हरच्या अदृश्य जगात लढले जात आहेत. त्यामुळेच जागतिक अर्थकारणासाठी हे एक मोठे अदृश्य महासंकट बनले आहे.

वित्तीय संस्था, बँका आणि शेअर बाजार हा कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असतो. आजवर हॅकर्स मानवी चुकांचा फायदा घेऊन पासवर्ड किंवा माहिती चोरत असत. पण आता कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून हॅकर्स अत्यंत प्रगत असे स्वयंचलित हल्ले करत आहेत. आवाजाची आणि चेहऱ्याची हुबेहूब नक्कल करणारे डीपफेक तंत्रज्ञान वापरून बँक अधिकाऱ्यांना फसवून अब्जावधी रुपयांचे बेकायदेशीर व्यवहार केले जात आहेत. याच तंत्राचा वापर करून तयार केले जाणारे बनावट ईमेल आणि संदेश इतके अचूक असतात की, त्यात आणि खऱ्या संदेशात फरक करणे अशक्य होते. शेअर बाजारात स्वयंचलित अल्गोरिदमचा वापर करून खोट्या बातम्या पसरवल्या जातात आणि सेकंदाच्या हजाराव्या भागात लाखो शेअर्सची खरेदी-विक्री करून बाजारात कृत्रिम घसरण घडवून आणली जाते. यात सर्वसामान्य गुंतवणूकदारांचे कोट्यवधी रुपये एका झटक्यात बुडतात. या हल्ल्यांचा वेग इतका प्रचंड असतो की, पारंपरिक सुरक्षा यंत्रणांना ते ओळखायला आणि रोखायला वेळही मिळत नाही.

जगातील सर्व बँका आणि वित्तीय संस्था एकमेकांशी डिजिटल प्रणालीने जोडलेल्या आहेत. एका मोठ्या बँकेची सुरक्षा प्रणाली भेदली गेली आणि तिचा सर्व्हर काही तासांसाठी ठप्प झाला, तर त्याचा परिणाम साखळी पद्धतीने संपूर्ण जगाच्या वित्तीय व्यवहारांवर होऊ शकतो. लोकांचा डिजिटल व्यवहारांवरचा आणि बँकिंग प्रणालीवरचा विश्वास उडाला, तर नागरिक घाबरून एकाच वेळी बँकांतून पैसे काढण्याचा प्रयत्न करतील, ज्यामुळे बँकांचे दिवाळे निघायला वेळ लागणार नाही. पैशांची देवाणघेवाण थांबली, तर व्यापार आणि उद्योग पूर्णपणे कोलमडून पडतील आणि अर्थव्यवस्थेत रोकड टंचाईची अराजकता माजेल.

भारत आज जगात डिजिटल व्यवहारांमध्ये आघाडीवर आहे. युनिफाईड पेमेंट्स इंटरफेससारख्या प्रणालीमुळे भारतातील तळागाळातील माणूस डिजिटल अर्थव्यवस्थेशी जोडला गेला आहे. वाढत्या डिजिटल विस्तारामुळे आणि नागरिकांमधील सायबर साक्षरतेच्या अभावामुळे भारताची वित्तीय प्रणाली हॅकर्ससाठी एक मोठे आणि सोपे लक्ष्य बनली आहे. याशिवाय, अवाढव्य लोकसंख्येचा विदा म्हणजेच नागरिकांची डिजिटल माहिती सुरक्षित ठेवण्याचे मोठे आव्हानही यंत्रणांसमोर आहे. भारताच्या रिझर्व्ह बँकेने आणि अर्थ मंत्रालयाने या अदृश्य धोक्याची वेळेवर दखल घेऊन कडक पावले उचलली नाहीत, तर भारताची डिजिटल क्रांतीच देशाच्या आर्थिक सुरक्षेपुढील सर्वात मोठा शाप ठरू शकते.

> » कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून होणारे सायबर हल्ले ही जागतिक वित्तीय स्थिरतेला बसलेली मोठी धडक आहे. बँका आणि शेअर बाजारांवर होणारे हे अदृश्य हल्ले देशाच्या अर्थव्यवस्थेचा पाया उद्ध्वस्त करू शकतात.

या नव्या युगातील आव्हानाला सामोरे जाताना मध्यवर्ती बँका आणि सरकारची भूमिका अत्यंत निर्णायक ठरते. बँकांच्या संचालक मंडळावर आता पारंपरिक अर्थतज्ज्ञांसोबतच सायबर सुरक्षा तज्ज्ञांची नियुक्ती करणे बंधनकारक केले पाहिजे. कोणत्याही छोट्या किंवा मोठ्या सायबर हल्ल्याची माहिती लपवून न ठेवता, ती तत्काळ नियामक संस्थांना देणे अनिवार्य असले पाहिजे, जेणेकरून वेळेवर उपाययोजना करून इतर संस्थांना सावध करता येईल. सुरक्षेच्या बाबतीत कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, हा स्पष्ट संदेश धोरणकर्त्यांनी वित्तीय बाजाराला दिला पाहिजे.

या नव्या संकटाचा सामना करण्यासाठी जुनी हत्यारे आणि जुने कायदे कुचकामी ठरणार आहेत. यासाठी सायबर सुरक्षेतही त्याच प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून हल्ले होण्यापूर्वीच ते ओळखून नष्ट करणारी स्वयंचलित सुरक्षा यंत्रणा उभी करावी लागेल. याशिवाय, जागतिक पातळीवर सर्व देशांनी एकत्र येऊन या तंत्रज्ञानाच्या वापरावर कठोर नियम आणि आचारसंहिता लागू करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाच्या या बुद्धिबळाच्या पटावर सावध राहून पुढची खेळी अचूकपणे ओळखणे, हाच जागतिक आणि देशांतर्गत वित्तीय स्थिरता टिकवण्याचा एकमेव मार्ग आहे.

# महापालिका अर्थसंकल्पावर पडला उपसूचनांचा पाऊस

## ११०० कोटींच्या प्रस्तावांपैकी ८० टक्के फेटाळले

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पावर नगरसेवक आणि स्थायी समितीकडून तब्बल १ हजार १०० कोटी रुपयांच्या उपसूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, त्यातील सुमारे ८० टक्के उपसूचना प्रशासनाने फेटाळल्याने नगरसेवकांनी त्या सर्वसाधारण सभेत मंजूर करून घेण्याचा सपाटा लावला आहे. गेल्या शुक्रवारी (दि. १५) झालेल्या सर्वसाधारण सभेत प्रभागनिहाय कामांसाठी निधी वळवण्याच्या अनेक उपसूचनांना मंजुरी देण्यात आली.

महापौर रवी लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत सत्ताधाऱ्यांनी विविध विषयांवर उपसूचना देत निधीचे फेरवाटप करण्याचा प्रयत्न केला. नाराज नगरसेवकांचे समाधान करण्यासाठी अनेक विकासकामांना नव्याने निधी देण्यात आला. जलक्षेत्रातील परिचालन, देखभाल आणि दुरुस्ती कामांना मुदतवाढ देतानाच निधीत वाढ-घट तसेच नवीन लेखाशीर्ष निर्माण करण्याच्या उपसूचनाही मंजूर करण्यात आल्या.

शहरातील ड्रेनेजलाईन मास्टर प्लॅनअंतर्गत नवीन मैला शुद्धीकरण प्रकल्प उभारणे, नाल्यांतील ड्रेनेजलाईन स्थलांतरित करणे, ताथवडे व दापोडी येथे नवीन प्रकल्प उभारणे या कामांसाठी निधी वाढविण्यात आला आहे. किवळे येथील पंप हाऊसमध्ये एनर्जी सेव्हिंगसाठी नवीन मैलाशुद्धीकरण केंद्र, चिखली परिसरातील रस्ते विकास आणि पाणीपुरवठा विभागाच्या ३२ पंप हाऊसच्या देखभाल-दुरुस्तीच्या सुधारित खर्चालाही मंजुरी देण्यात आली.

प्रभाग क्रमांक ५ आणि १४ मध्ये विद्युत खांबांना शॉकप्रूफ रंग देणे, विद्युत दिव्यांचे नूतनीकरण, पिंपरीतील महात्मा फुले सृष्टीतील म्युरलची कामे, पिंपळे सौदागर येथे खेळाचे मैदान आणि लिनिअर गार्डन विकसित करण्यासाठी नव्याने २ कोटी ५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. भामा आसखेड पाणी योजनेसाठी भूमिगत जलवाहिनीच्या कामाकरिता सुधारित १२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पिंपळे गुरव येथील कल्पतरू चौकातील सबवे प्रकल्पासाठी ३५ कोटींऐवजी ५१ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. तसेच पिंपळे सौदागर येथील पी. के. चौक सिग्नल फ्री करण्यासाठी ४५ कोटींवरून ८६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. शिवसृष्टी, रस्ते, जलतरण तलाव, व्यायामशाळा, हरित सेतूअंतर्गत अर्बन स्ट्रीट विकास, नवीन क्षेत्रीय कार्यालये आणि विरुंगळा केंद्रातील लिफ्ट यांसारख्या कामांनाही उपसूचनांद्वारे मान्यता देण्यात आली आहे. अर्थसंकल्पात काही नवीन लेखाशीर्ष तयार करण्यालाही मंजुरी देण्यात आली आहे. हरितसेतू प्रकल्पासाठी ग्रीन बॉण्डद्वारे उभारण्यात आलेल्या २०० कोटी रुपयांच्या निधीसाठी स्वतंत्र लेखाशीर्ष तयार करण्यात येणार आहे. तसेच प्रकल्पग्रस्त आणि बेघर नागरिकांसाठी घरे देण्याकरिता स्वतंत्र निधी उभारला जाणार असून एसआरए प्रकल्पांतील शुल्क झोपडपट्टी पायाभूत सुविधा निधीत जमा केले जाणार आहे. चिखली येथील टाऊन हॉलला नाव देण्यावरूनही राजकीय रस्सीखेच रंगली आहे. भाजपकडून “जगद्गुरू संत तुकाराम महाराज” हे नाव सुचविण्यात आले असून राष्ट्रवादी काँग्रेसकडून दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे नाव देण्याची मागणी करण्यात आली आहे. महापौर रवी लांडगे कोणत्या उपसूचनेला अंतिम मान्यता देणार याकडे आता लक्ष लागले आहे.

# ‘कचराकुंडीविरहित प्रभाग’ संकल्पना भोसरीत फसली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भोसरी** : पिंपरी-चिंचवड महापालिकेने स्वच्छ आणि सुंदर शहराच्या उद्देशाने शहरातील कचराकुंड्या हटवून ‘कचराकुंडीविरहित प्रभाग’ ही संकल्पना राबविली. मात्र, प्रत्यक्षात कचराकुंड्या हटल्या असल्या तरी त्या जागांवरच पुन्हा कचऱ्याचे ढीग साचत असल्याचे चित्र शहरात, विशेषतः भोसरी परिसरात दिसून येत आहे.

महापालिकेने शहर स्वच्छ ठेवण्यासाठी घराघरांतून कचरा संकलन व्यवस्था सुरू केली आहे. तरीदेखील अनेक नागरिक रस्त्याच्या कडेला, मोकळ्या जागांमध्ये किंवा पूर्वी कचराकुंड्या असलेल्या ठिकाणीच कचरा टाकत असल्याचे दिसून येत आहे. परिणामी दुर्गंधी, डासांचे प्रमाण आणि अस्वच्छता वाढून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

कचरा संकलनासाठी गाड्या नियमितपणे पाठविल्या जातात. मात्र, अनेक नागरिक घंटागाडीची वाट न पाहता थेट रस्त्यावर किंवा रिकाम्या जागेत कचरा टाकतात, त्यामुळे स्वच्छता राखण्यात अडचणी निर्माण होत असल्याचे विभागातील कर्मचाऱ्यांनी स्पष्ट केले. महापालिका स्वच्छ शहराचा दावा करत असताना प्रत्यक्षात कचराकुंडीविरहित प्रभाग संकल्पना धुळीस मिळाल्याचे चित्र दिसत आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये घरगणना मोहिमेला सुरुवात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी** : जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्याअंतर्गत पिंपरी-चिंचवड शहरात घर यादी व घरगणना मोहिमेला बुधवारपासून (दि. २०) सुरुवात होत आहे. या मोहिमेसाठी महापालिकेकडून एकूण ६ हजार ७०२ पर्यवेक्षक आणि प्रगणकांची नियुक्ती करण्यात आली असून ही मोहीम १४ जूनपर्यंत चालणार आहे.

महापालिकेने या मोहिमेसाठी महापालिका व खासगी शाळांतील शिक्षक तसेच विविध विभागांतील कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. त्यामध्ये महापालिका शाळा व आयटीआयमधील ५ हजार ५०२ शिक्षकांचा समावेश आहे, तर महापालिकेच्या विविध विभागांतील १ हजार ४०० कर्मचारीही या कामात सहभागी होणार आहेत. प्रत्येक प्रगणकाकडे सुमारे २०० घरांची जबाबदारी देण्यात आली असून एका पर्यवेक्षकाकडे तीन प्रगणकांचे नियंत्रण असणार आहे.

प्रगणकांनी शनिवारी (दि. १६) आपल्या मोबाईलमध्ये जनगणनेचे ॲप डाउनलोड केले. रविवारी (दि. १७) लॉगिन करून त्यांना नेमून दिलेल्या परिसराचा नकाशा तपासण्यात आला. सोमवारी (दि. १८) परिसरातील घरांचा कच्चा नकाशा तयार करण्यात आला असून आता बुधवारपासून प्रत्यक्ष घरोघरी जाऊन माहिती संकलनास सुरुवात होणार आहे. महापालिकेने यासाठी वेळापत्रक निश्चित केले आहे. त्यानुसार २५ मेपर्यंत ४० टक्के, ३० मेपर्यंत ७० टक्के आणि ५ जूनपर्यंत ९५ टक्के नोंदणी पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. उर्वरित दिवसांमध्ये बंद असलेली किंवा ज्या ठिकाणी नागरिक उपलब्ध नव्हते अशा घरांना पुन्हा भेट दिली जाणार आहे. या मोहिमेदरम्यान प्रगणक नागरिकांकडून कुटुंब, घर, मालमत्ता, आहार, वाहन आणि इतर सुविधा यासंदर्भातील माहिती घेणार आहेत. घराचा प्रकार, इमारतीचा क्रमांक, मजल्यांची संख्या, वापरले जाणारे धान्य, मोबाईल क्रमांक, कुटुंबातील सदस्यांची संख्या, कुटुंबप्रमुखाचे नाव, लिंग, जात, घर स्वतःचे की भाड्याचे, खोल्यांची संख्या तसेच विवाहित जोडप्यांची संख्या याबाबत माहिती नोंदवली जाणार आहे. याशिवाय पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत, प्रकाश व्यवस्था, शौचालय आणि बाथरूमचा प्रकार, स्वयंपाकघर, गॅसजोडणी तसेच रेडिओ, टीव्ही, इंटरनेट, संगणक, लॅपटॉप, मोबाईल, दुचाकी किंवा चारचाकी वाहन यांची माहितीही संकलित केली जाणार आहे.

महापालिकेचे उपायुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, जनगणनेत संकलित होणारी सर्व माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाते आणि ती केवळ शासकीय नियोजनासाठी वापरली जाते. त्यामुळे नागरिकांनी कोणतीही शंका न बाळगता अचूक आणि प्रामाणिक माहिती द्यावी, असे आवाहन त्यांनी केले आहे.

# कार्यालयात घुसून एक लाखाची खंडणी मागितली

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे** : हिंजवडी परिसरातील एका कंपनीच्या कार्यालयात घुसून ठेकेदाराकडे एक लाख रुपयांची खंडणी मागितल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी हिंजवडी पोलिसांनी चार जणांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अनिल शिवाजीराव अंभुरे (वय ३०, रा. महादेवनगर, सुस, पुणे) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. ही घटना १८ मे २०२६ रोजी दुपारी साडेएकच्या सुमारास हिंजवडीतील रासझिंग स्पेसेस कंपनीच्या कार्यालयात घडली. या प्रकरणी दत्तात्रय अर्जुन ठाकरे, चेतन ओव्हाळ, सुशांत भालेकर आणि संदीप देशभ्रतार यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीनुसार, आरोपी कारमधून कंपनीच्या कार्यालयात आले आणि थेट फिर्यादीच्या केबिनमध्ये घुसले. त्यांनी शिवीगाळ करत धमकावण्यास सुरुवात केली. “साईटवरील बांधकाम साहित्याचे काम आम्हाला का दिले नाही? आमच्याकडून साहित्य खरेदी का केले नाही? त्यामुळे आमचे मोठे नुकसान झाले आहे,” असे म्हणत आरोपींनी एक लाख रुपयांची खंडणी मागितली. तसेच, “पैसे दिले नाहीत तर जिवंत सोडणार नाही, गाडीत हत्यार ठेवले आहे,” अशी धमकीही आरोपींनी दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी हिंजवडी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३२४/२०२६ नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### संशयातून चाकू हल्ला

**पिंपरी** : देहूरोड परिसरातील सनव्हीव अपार्टमेंटमध्ये पत्नीशी फोनवर बोलल्याच्या संशयातून एका तरुणावर चाकूने हल्ला करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी देहूरोड पोलिसांनी एका आरोपीला अटक केली आहे.

याप्रकरणी देहूरोड पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १३४/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ११८(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना १७ मे २०२६ रोजी रात्री सुमारे १०.३५ वाजण्याच्या दरम्यान सनव्हीव अपार्टमेंटच्या टेरेसवर घडली. याबाबत निलेश बाबासाहेब साठे (वय ३४, रा. फ्लॅट नं. ०७, सनव्हीव अपार्टमेंट, शिंदे पेट्रोल पंपाजवळ, विकासनगर, किवळे, ता. हवेली, जि. पुणे) यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी विक्रांत काशीनाथ कुसळे (वय ३१, रा. फ्लॅट नं. ०९, सनव्हीव अपार्टमेंट, विकासनगर, किवळे, पुणे) याने फिर्यादी आपल्या पत्नीशी फोनवर का बोलतो, या कारणावरून त्याच्याशी वाद घातला. वाद विकोपाला गेल्यानंतर आरोपीने फिर्यादीवर चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात फिर्यादीच्या डाव्या पायाच्या मांडीवर तसेच पोटाच्या डाव्या बाजूस वार करण्यात आले असून त्यात तो गंभीर जखमी झाला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राठोड करीत आहेत.

### मोबाईल आणि चांदीचे ब्रेसलेट लंपास

**पिंपरी** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसरात झोपलेल्या एका तरुणाचा मोबाईल फोन आणि चांदीचे ब्रेसलेट अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी संत तुकाराम नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अनिकेत सुधाकर सोनवणे (वय २७, रा. बोपोडी, पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. १६ मे रोजी रात्री १० वाजल्यापासून ते १७ मे रोजी सकाळी ६ वाजेपर्यंत ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या मागील मैदान परिसरात झोपले होते. सकाळी उठल्यानंतर त्यांच्या जवळ ठेवलेला मोबाईल फोन आणि हातातील चांदीचे ब्रेसलेट चोरीला गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. परिसरात शोध घेऊनही साहित्य मिळून न आल्याने अज्ञात चोरट्याने चोरी केल्याची खात्री झाल्यानंतर त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# शॉर्ट सर्किटमुळे भीषण आग; संसार जळून खाक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वडगाव मावळ** : मावळ तालुक्यातील बेडसे गावात शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या भीषण आगीत एका विधवा महिलेचा संसार डोळ्यांसमोर जळून खाक झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. अवघ्या वर्षभरापूर्वी पतीच्या निधनाच्या धक्क्यातून सावरत संसार उभा करण्याचा प्रयत्न सुरू असतानाच या आगीत सर्वस्व नष्ट झाल्याने कुटुंबावर मोठे संकट कोसळले आहे.

बेडसे येथील शालन दहिभाते यांच्या कच्च्या घरात दुपारच्या सुमारास अचानक शॉर्ट सर्किट होऊन आग लागली. उष्णतेमुळे आणि घर कच्च्या स्वरूपाचे असल्याने आग काही क्षणांतच संपूर्ण घरभर पसरली. ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत आग विझविण्याचा प्रयत्न केला; मात्र आगीची तीव्रता इतकी मोठी होती की संपूर्ण घर जळून खाक झाले. या आगीत घरातील धान्य, तांदूळ, कपडे, भांडी, संसारोपयोगी साहित्य, महत्त्वाची कागदपत्रे पूर्णपणे जळून नष्ट झाली.

पतीच्या निधनानंतर मोठ्या जिद्दीने संसार सांभाळणाऱ्या या महिलेपुढे आता निवाऱ्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे. घर जळताना पाहून शालन दहिभाते यांचा आक्रोश उपस्थित ग्रामस्थांच्या डोळ्यात पाणी आणणारा होता. ऐन पावसाळ्याच्या तोंडावर कुटुंब उघड्यावर आल्याने ग्रामस्थांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**लोणी काळभोर :** थेऊर (ता. हवेली) परिसरात अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. सहा वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचाराचा प्रयत्न झाल्याची घटना ताजी असतानाच, आता अकरावीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीशी छेडछाड केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. "तू खूप सुंदर दिसतेस" असे म्हणत विद्यार्थिनीचा हात पकडून तिच्याशी लगट करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी अक्षय साहेबराव चव्हाण (रा. जय मल्हार ढाब्याशेजारी, थेऊर, ता. हवेली, जि. पुणे) याच्याविरुद्ध लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित मुलीच्या ४० वर्षीय आईने याबाबत फिर्याद दिली आहे. ही घटना १० किंवा ११ मार्च २०२६ रोजी सकाळी दहाच्या सुमारास चव्हाणवस्ती परिसरात घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित अल्पवयीन मुलगी शाळेत जात असताना आरोपी अक्षय चव्हाण याने तिचा हात पकडत तिच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर सुमारे आठ दिवसांनी पुन्हा एकदा विद्यार्थिनी शाळेत जात असताना दादा गायकवाड यांच्या घराजवळ आरोपी तिच्या जवळ गेला. त्याने तिचा हात पकडून तिला स्वतःकडे ओढले व तिच्या मनाला लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. तसेच, "ही बाब कोणाला सांगितली तर तुझ्या वडिलांना मारून टाकीन," अशी धमकीही आरोपीने दिली आहे. या प्रकारामुळे मुलगी आणि तिचे कुटुंब भयभीत झाले असून परिसरात संताप व्यक्त केला जात आहे. पीडित मुलीच्या आईने पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपी अक्षय चव्हाण याच्यावर भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ चे कलम ७४, ३५१ (२) आणि लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लोणी काळभोर पोलीस पुढील तपास करत आहेत.

---

#### तासनतास रांगा; नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण

# गॅस सिलिंडर टंचाईमुळे ग्रामस्थ हैराण

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**भवानीनगर :** आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम आता ग्रामीण भागातील घरगुती गॅस पुरवठ्यावरही दिसून येत असून, भवानीनगर परिसरातील ग्रामस्थांना गॅस सिलेंडर मिळवण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. गॅस सिलेंडरचे वितरण अद्याप सुरळीत झाले नसल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गॅस सिलेंडरचा पुरवठा वेळेवर होत नसल्यामुळे टंचाई निर्माण झाली आहे. पूर्वी एका सिलेंडरनंतर दुसरा सिलेंडर तुलनेने लवकर मिळत होता; मात्र आता दुसरा सिलेंडर मिळण्यासाठी तब्बल ४५ दिवसांची प्रतीक्षा करावी लागत आहे. त्यामुळे मोठ्या कुटुंबांसमोर गंभीर अडचणी निर्माण झाल्या आहेत.

गॅस सिलेंडर मिळवण्यासाठी नागरिकांना कडक उन्हात तासन्तास रांगेत उभे राहावे लागत आहे. भवानीनगर परिसरातील नागरिकांना सिलेंडर घेण्यासाठी सुमारे १५ ते २० किलोमीटर अंतरावर असलेल्या वालचंदनगर येथील गॅस एजन्सीच्या मुख्य शाखेत जावे लागत आहे. गॅस टंचाईमुळे एजन्सींनी गावागावांतील स्थानिक आउटलेट बंद केल्याने नागरिकांची गैरसोय अधिक वाढली आहे. अनेक एजन्सींनी गावांमध्ये आउटलेट सुरू केले होते आणि घरपोच सिलेंडर पुरवठाही होत होता. त्यामुळे ग्रामस्थांना सहजपणे गॅस उपलब्ध होत होता. मात्र, सध्याच्या परिस्थितीत नागरिकांना मुख्य शाखेत जाऊन सिलेंडर आणावा लागत आहे. या समस्येमुळे नोकरदारांना कामावरून सुट्टी घ्यावी लागत आहे, तर मजुरी करणाऱ्या कामगारांचे दिवसाचे उत्पन्न बुडत आहे. व्यापाऱ्यांनाही व्यवसाय बंद करून सिलेंडरसाठी जावे लागत असल्याने आर्थिक फटका बसत आहे. घरपोच सेवा बंद झाल्याने तसेच जवळच्या आउटलेटवर सिलेंडर उपलब्ध होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. पुरवठा पूर्ववत करून गावपातळीवरील वितरण व्यवस्था सुरू करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

---

# पुरंदर विमानतळासाठी १०० टक्के भूसंपादनाचे लक्ष्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी १५ जूनपर्यंत शंभर टक्के भूसंपादन पूर्ण करण्याचे लक्ष्य जिल्हा प्रशासनाने निश्चित केले आहे. मोबदल्याच्या सूत्राला अंतिम स्वरूप दिल्यानंतर शेतकऱ्यांकडून संमतिपत्रे मिळविण्याची प्रक्रिया अधिक वेगाने सुरू झाल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.

प्रकल्पाची भूसंपादन प्रक्रिया गतीमान करण्यासाठी प्रशासनाकडून शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला जात असून मोबदला, पुनर्वसन आणि इतर सुविधांबाबत माहिती दिली जात आहे. मोबदल्याचे सूत्र स्पष्ट झाल्यानंतर अनेक शेतकऱ्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. गेल्या काही दिवसांत मोठ्या प्रमाणात संमतिपत्रे जमा झाली असून रखडलेली प्रक्रिया आता अंतिम टप्प्यात पोहोचल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. मात्र, काही गावांमधील शेतकरी आणि ग्रामस्थांकडून अजूनही प्रकल्पाला विरोध कायम आहे. जमिनींचे मूल्यांकन, पुनर्वसनाची हमी आणि भविष्यातील रोजगाराच्या संधी याबाबत स्थानिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. सरकारने केवळ आर्थिक मोबदला न देता दीर्घकालीन विकासाचा स्पष्ट आराखडा जाहीर करावा, अशी मागणीही काही संघटनांनी केली आहे.

दरम्यान, प्रशासनाने भूसंपादन प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने सुरू असल्याचा दावा केला आहे. उर्वरित अडचणी संवादातून सोडविल्या जातील, असा विश्वास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

---

# पारगाव येथे जनगणना मोहिमेला प्रारंभ



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील पारगाव येथे भारतीय जनगणना मोहिमेला प्रारंभ झाला असून, घरगणना आणि घरयादी जनगणनेचे काम सुरू करण्यात आले आहे. या मोहिमेचा कालावधी १६ मे ते १४ जून २०२६ असा निश्चित करण्यात आला आहे.

या मोहिमेअंतर्गत जनगणनेचे चार टप्पे निश्चित करण्यात आले आहेत. पहिल्या टप्प्यात घरांची स्थिती, घराचा वापर तसेच उपलब्ध मूलभूत सुविधांबाबत सुमारे ३३ ते ३५ प्रश्न विचारले जात आहेत. दुसऱ्या टप्प्यात फेब्रुवारी २०२७ मध्ये लोकसंख्या गणना केली जाणार असून त्यामध्ये प्रत्यक्ष लोकसंख्या, कुटुंब प्रमुखांची माहिती, शिक्षण, व्यवसाय यांसह विविध तपशील संकलित करण्यात येणार आहेत. विशेष म्हणजे, १९३१ नंतर प्रथमच या जनगणनेत जातीनिहाय गणनेचाही समावेश करण्यात आला आहे. याशिवाय आर्थिक आणि सामाजिक स्थिती, उत्पन्नाचे स्रोत तसेच मूलभूत सुविधांबाबतची माहितीही संकलित केली जाणार आहे. या जनगणनेनंतर महाराष्ट्राची अचूक आणि अद्ययावत लोकसंख्या समोर येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

या मोहिमेसाठी पारगावचे माजी उपसरपंच विठ्ठल ढोबळे आणि पर्यवेक्षक विजय वळसे हे संपूर्ण परिसरातील कामकाजाची जबाबदारी सांभाळत आहेत. तसेच चिचगाई मळा परिसरात प्रगणक म्हणून मोनिका नाटे या जनगणनेचे काम करत आहेत.

---

# किरकोळ धक्क्याच्या वादातून ज्येष्ठाचा खून

#### चाकण पोलिसांकडून तिघांना अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**चाकण :** चाकण एमआयडीसी परिसरात किरकोळ धक्का लागल्याच्या वादातून ६० वर्षीय ज्येष्ठ व्यक्तीचा दगडाने ठेचून खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी चाकण दक्षिण पोलिसांनी तिघांना अटक केली असून तांत्रिक तपास, मोबाईल लोकेशन आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींपर्यंत पोहोचण्यात पोलिसांना यश आले.

नाजीर शेख (वय ६०, मूळ रा. पश्चिम बंगाल) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. या प्रकरणी रोहन मोहन शिंदे (वय २४, सध्या रा. वाडा रोड, ता. खेड, मूळ रा. राहुरी, जि. अहिल्यानगर), योगेश पोपट पवार (वय २३, सध्या रा. बिरदवडी, ता. खेड, मूळ रा. भोसरी) आणि रवींद्र राजेंद्र शेजुळ (वय ३०, सध्या रा. बिरदवडी, ता. खेड, मूळ रा. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर) यांना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चाकणमधील आयएआय कंपनीच्या मागील बाजूस असलेल्या नाणेकरवाडी परिसरातील रस्त्यावर तीन अनोळखी इसम गंभीर जखमी अवस्थेतील व्यक्तीला उचलून नेत असल्याचे काही नागरिकांच्या निदर्शनास आले. जखमीच्या डोक्यातून मोठ्या प्रमाणात रक्तस्राव होत होता. घटनास्थळी रक्ताने माखलेला दगड आणि रक्ताचे डागही आढळून आले. याबाबतची माहिती चाकण दक्षिण पोलिसांना देण्यात आली.

पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत जखमी नाजीर शेख यांना उपचारासाठी चाकण येथील रुग्णालयात दाखल केले. प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी पिंपरी येथील वायसीएम रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान १५ मे २०२६ रोजी त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर गुन्ह्यात खुनाचे कलम वाढविण्यात आले.

या प्रकरणाचा तपास करताना पोलिसांनी चाकण, पिंपरी-चिंचवड तसेच परजिल्ह्यातील सुमारे ७० ते ८० सीसीटीव्ही फुटेजची पडताळणी केली. मोबाईल लोकेशन, तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींचा संबंध पुणे आणि नाशिक जिल्ह्याशी असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानुसार खेड, मंचर, नारायणगाव, संगमनेर, सिन्नर आणि नाशिक परिसरात शोधमोहीम राबवून तिघांना ताब्यात घेण्यात आले. सखोल चौकशीत आरोपींनी किरकोळ धक्का लागल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून नाजीर शेख यांच्या डोक्यात दगड घालून खून केल्याची कबुली दिली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास चाकण दक्षिण पोलीस करत आहेत.

---

# भराडीतील दोन डीपींच्या तारा चोरीला



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील भराडी येथील गावडे मळा परिसरातील दोन विद्युत डीपीमधील तांब्याच्या तारा अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना मंगळवारी (१९ मे) मध्यरात्री उघडकीस आली. या प्रकारामुळे परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला असून शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत.

या चोरीमुळे सिंचनासाठी आवश्यक असलेला वीजपुरवठा पूर्णपणे बंद पडला आहे. आधीच कमी दाबाचा वीजपुरवठा, ४५ अंशांपर्यंत पोहोचलेले तापमान, बंधाऱ्यातील अत्यल्प पाणीसाठा आणि दिवसाआड पिकांना पाणी देण्याची वेळ आलेली असताना या घटनेने शेतकऱ्यांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे.

वीज नसल्याने मोटारी बंद पडल्या असून पिकांच्या सिंचनाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे भाजीपाला, फळबागा आणि इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या घटनेमुळे ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण आहे.

दरम्यान, प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन वीजपुरवठा पूर्ववत करावा, तसेच चोरी करणाऱ्या आरोपींचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

---

# जाब विचारला म्हणून हॉटेल चालकाच्या पतीवर जीवघेणा हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण :** हॉटेलमध्ये येऊन विनाकारण शिवीगाळ करणाऱ्या ग्राहकांना जाब विचारून बाहेर जाण्यास सांगितल्याच्या रागातून दोन जणांनी हॉटेल चालक महिलेच्या पतीवर काचेच्या बाटलीने जीवघेणा हल्ला केल्याची घटना करंजविहीरे येथे घडली. यात संबंधित व्यक्ती गंभीर जखमी झाली असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

याप्रकरणी ममता योगेश कोळेकर (वय २८, रा. करंजविहीरे, ता. खेड) यांनी उत्तर महाळुंगे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार शांताराम धोंडीबा नवले (वय ४१) आणि दिनेश ज्ञानेश्वर जाधव (वय ३९, दोघे रा. वाहगाव, ता. खेड, जि. पुणे) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी त्यांना अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खेड तालुक्यातील करंजविहीरे गावाच्या हद्दीतील 'साई सिद्धी' हॉटेलमध्ये ही घटना घडली. आरोपी हॉटेलमध्ये आले आणि त्यांनी अचानक शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यावेळी हॉटेल चालवणाऱ्या ममता कोळेकर यांनी आरोपींना शिवीगाळ न करण्यास सांगत हॉटेलमधून बाहेर जाण्यास सांगितले. याच कारणाचा राग मनात धरून आरोपींनी फिर्यादी महिलेला अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली आणि त्यानंतर तिच्या पतीवर हल्ला चढवला. आरोपींनी काचेच्या बाटलीने त्यांच्या डोक्यावर, मानेवर आणि कंबरेवर वार करत जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

---

# गोशाळांना १२ टन हिरव्या चाऱ्याचे वाटप

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर :** वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे मुक्या जनावरांचे हाल होऊ नयेत, यासाठी राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरु सोशल फाऊंडेशनच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही चारा वाटप उपक्रम राबविण्यात आला. सामाजिक बांधिलकी जपत तालुक्यातील चार प्रमुख गोशाळांना तब्बल १२ टन हिरवागार मक्याचा चारा मोफत देण्यात आला आहे.

ऐन उन्हाळ्यात सर्वत्र चारा टंचाई निर्माण झाल्याने गोशाळांमधील गोधनाच्या पालनपोषणाचा प्रश्न गंभीर बनला होता. ही बाब लक्षात घेऊन फाऊंडेशनने तातडीने पुढाकार घेत गोशाळांना हिरवा चारा उपलब्ध करून दिला. या उपक्रमामुळे गोशाळा प्रशासनाने समाधान व्यक्त करत फाऊंडेशनचे आभार मानले आहेत.

या उपक्रमांतर्गत आचार्य विनोबा भावे गोशाळा, कोयाळी येथे ४ टन, माऊली गोशाळा, बिरदवडी येथे ३ टन, श्रीसमर्थ गोशाळा, श्री क्षेत्र भीमाशंकर येथे ३ टन आणि श्री क्षेत्र कुंडेश्वर गोशाळा येथे २ टन असा एकूण १२ टन हिरव्या मक्याच्या चाऱ्याचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी फाऊंडेशनच्या उपाध्यक्षा नाजनीन शेख, सचिव अमर टाटीया, संचालक संतोष सांडभोर, दिलीप होले, सुनील वाळुंज, राहुल मलघे, संगीता तनपुरे आणि प्रियांका दिघे यांनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी फाऊंडेशनचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. गोशाळांमधील मुक्या जनावरांप्रती फाऊंडेशनने दाखविलेल्या या संवेदनशीलतेचे परिसरात कौतुक होत आहे.

---

#### विवाह मुहूर्तासाठी थेट जानेवारी २०२७ ची प्रतीक्षा

# अधिक मासामुळे लग्नसराईला लागला ब्रेक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**रांजणगाव गणपती :** शुभविवाहासाठी शुभ मुहूर्ताला विशेष महत्त्व दिले जाते. मात्र, यंदा अधिक मास, गुरु-शुक्र अस्त, चातुर्मास आणि सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर विवाह मुहूर्तांचा मोठा खंड पडणार आहे. त्यामुळे लग्नाची बोलणी सुरू असलेल्या अनेक कुटुंबांना आता थेट जानेवारी २०२७ पर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे.

यंदा १७ मे ते १५ जून या कालावधीत अधिक मास अर्थात 'धोंड्याचा महिना' सुरू झाला आहे. हिंदू धर्मशास्त्रानुसार या काळात कोणतेही शुभ कार्य केले जात नाही. त्यानंतर जुलै महिन्यापासून गुरु आणि शुक्र ग्रहांचा अस्त सुरू होणार असून चातुर्मासालाही प्रारंभ होईल. या काळातही विवाहासारखी मंगल कार्ये वर्ज्य मानली जातात. याशिवाय ऑक्टोबर महिन्यात नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन होत असल्याने त्याचाही परिणाम विवाह मुहूर्तांवर होणार आहे. या सर्व कारणांमुळे विवाहासाठी योग्य मुहूर्त थेट जानेवारी २०२७ मध्ये उपलब्ध होणार असल्याचे ज्योतिष अभ्यासकांकडून सांगितले जात आहे.

दरम्यान, सध्या विवाह मुहूर्त नसल्याने मंगल कार्यालये, बँड पथके, केटरिंग व्यवसाय, फोटोग्राफर आणि संबंधित व्यावसायिकांकडे ग्राहकांची संख्या घटली आहे. विवाह सोहळ्यांमुळे लाखो रुपयांची उलाढाल होत असते. मात्र, तब्बल साडेसात महिने शुभ मुहूर्त नसल्याने या व्यवसायांवर आर्थिक संकट ओढवण्याची शक्यता व्यक्त होत आहे. विवाह मुहूर्त पुन्हा सुरू झाल्यानंतर एकाच दिवशी मोठ्या प्रमाणात विवाह सोहळे होण्याची शक्यता असल्याने नातेवाईक आणि कुटुंबीयांनाही नियोजनाचा मोठा पेच निर्माण होणार आहे.

यंदा तीन वर्षांनंतर अधिक मास आल्याने १७ मेपासून विवाहाचे मुहूर्त थांबले आहेत. त्यानंतर गुरु-शुक्र अस्त, चातुर्मास आणि सिंहस्थ कुंभमेळा यामुळे थेट जानेवारी २०२७ मध्येच शुभ विवाह मुहूर्त उपलब्ध होणार आहेत.

विवाहसोहळ्यांमुळे मंगल कार्यालये, मंडप व्यावसायिक, बँड पथके, किराणा दुकानदार, आचारी आणि केटरिंग व्यवसायाला मोठी आर्थिक चालना मिळते. मात्र, साडेसात महिने शुभ मुहूर्त नसल्याने या व्यवसायांवर मोठा परिणाम होणार आहे.

---

# आशियाई कुस्ती स्पर्धेसाठी प्रा. दिनेश गुंड यांची निवड

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळंदी :** जागतिक कुस्ती संघटनेच्या वतीने २२ ते २६ मे २०२६ या कालावधीत व्हिएतनाम येथे होणाऱ्या २३ वर्षांखालील आशियाई कुस्ती स्पर्धेसाठी प्रा. दिनेश गुंड यांची भारतीय कुस्ती संघाकडून तांत्रिक अधिकारी म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण असून नव्या पिढीसमोर त्यांनी आदर्श निर्माण केला आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे प्रतिनिधित्व करण्याची ही त्यांची ६९ वी स्पर्धा ठरणार आहे. राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील २०० हून अधिक स्पर्धांमध्ये त्यांनी योगदान दिले असून आंतरराष्ट्रीय स्तरावर ६९ स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणारे ते महाराष्ट्रातील एकमेव तांत्रिक अधिकारी आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष रामदास तडस, सरचिटणीस योगेश दोडके, कार्याध्यक्ष संदीपआप्पा भोंडवे, पुणे जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष मेघराज कटके तसेच पै. बाळासाहेब चौधरी यांनी अभिनंदन केले आहे.

## सारांश वृत्त

### ड्रोनने टाकलेले अंमली पदार्थ जप्त

**जम्मू :** सुरक्षा दलांनी बुधवारी जम्मू जिल्ह्याच्या सीमावर्ती भागातून संशयित अंमली पदार्थांचे संशयित पाकीट जप्त केले. एका स्थानिक रहिवाशाने शेत कसताना ते पाहिले तेव्हा बिश्नाह परिसरातील बहादूरपूर पंचायतीकडून हे पाकीट जप्त करण्यात आले. त्यांना माहिती मिळताच सीमा सुरक्षा दल (बीएसएफ) आणि पोलिसांच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेतली आणि परिसराला घेराव घातला.

### सायबर फसवणूक रॅकेटचा पर्दाफाश

**नवी दिल्ली :** दिल्ली पोलिसांनी एप्रिल महिन्यात राबविलेल्या महिनाभराच्या विशेष मोहिमेत अनेक आंतरराज्यीय सायबर फसवणूक टोळ्यांचा पर्दाफाश करत तब्बल ८९ जणांना ताब्यात घेतले आहे. या कारवाईदरम्यान सुमारे ४० कोटी रुपयांच्या व्यवहारांशी संबंधित सायबर फसवणूक नेटवर्क उघडकीस आले असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी बुधवारी दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या मोहिमेत ३५ आरोपींना अटक करण्यात आली, तर ५४ संशयितांना चौकशीसाठी ताब्यात घेऊन इशारे देण्यात आले. याशिवाय ३४ मोठ्या सायबर फसवणूक प्रकरणांचा तपास पूर्ण करण्यात आला.

### उत्तर बंगालमध्ये पावसाचा अंदाज

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या राजधानीत बुधवारी सकाळी दमट पावसाची नोंद झाली असून हवामान खात्याने पश्चिमेकडील उष्ण हवामानाची परिस्थिती आणि राज्याच्या उत्तरेकडील भागात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तविला आहे. कोलकात्यात किमान तापमान २८.७ अंश सेल्सिअस नोंदले गेले, जे सामान्यपेक्षा दोन अंशांनी जास्त आहे. बुधवारी महानगरात ढगाळ वातावरण असून मेघगर्जनेसह हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. उत्तर बंगाल आणि दक्षिण बंगालच्या काही भागात गडगडाटी वादळ येण्याची शक्यता आहे, असे हवामान खात्याने म्हटले आहे.

## भारत-इटली संबंधांना नवी गती

# रोममध्ये मोदी-मेलोनी यांची भेट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**रोम :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांची रोम येथे भेट घेत द्विपक्षीय संबंधांवर सविस्तर चर्चा केली. औपचारिक बैठकीपूर्वी दोन्ही नेत्यांनी ऐतिहासिक कोलोझिएमला भेट देत विविध जागतिक आणि द्विपक्षीय विषयांवर विचारांची देवाणघेवाण केली.

भेटीनंतर पंतप्रधान मोदी यांनी 'एक्स'वर पोस्ट करत रोममध्ये पोहोचल्यानंतर पंतप्रधान मेलोनी यांच्यासोबत रात्रीच्या जेवणावेळी चर्चा झाल्याचे सांगितले. तसेच कोलोसियम भेटीदरम्यान भारत-इटली मैत्री अधिक मजबूत करण्याबाबत सकारात्मक संवाद झाल्याचे त्यांनी नमूद केले.



पंतप्रधान मेलोनी यांनीही सोशल मीडियावर दोन्ही नेत्यांचे छायाचित्र शेअर करत मोदींचे रोममध्ये स्वागत केले. कोलोसियम परिसरातील दोन्ही नेत्यांचे जुने छायाचित्रही त्यांनी पोस्ट केले, ज्यातून भारत-इटली संबंधांतील वाढता जिव्हाळा अधोरेखित झाला.

या भेटीदरम्यान पंतप्रधान मोदी यांनी मेलोनी यांना 'मेलोडी' टॉफीचा खास संच भेट दिला. 'मेलोडी मोमेंट' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या हलक्याफुलक्या प्रसंगामुळे दोन्ही नेत्यांमध्ये आनंदी वातावरण निर्माण झाले. मेलोनी यांनीही या भेटीबद्दल मोदींचे आभार मानत तो क्षण सोशल मीडियावर शेअर केला.

दरम्यान, रोममध्ये आगमनानंतर भारतीय समुदायाकडून पंतप्रधान मोदी यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. त्यांनी भारतीय समुदायातील सदस्यांशी संवाद साधला तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचाही आस्वाद घेतला. एका लहान मुलाने सादर केलेल्या त्यांच्या चित्रावर त्यांनी स्वाक्षरीही केली.

भारत आणि इटली यांच्यातील संबंधांना अलीकडच्या काळात नवी चालना मिळाली असून दोन्ही देशांनी संयुक्त धोरणात्मक कृती आराखडा २०२५-२०२९ पुढे नेण्याचा निर्णय घेतला आहे. या आराखड्यात व्यापार, गुंतवणूक, संरक्षण, स्वच्छ ऊर्जा, नवोन्मेष, विज्ञान-तंत्रज्ञान आणि लोकांमधील देवाणघेवाण यांसारख्या क्षेत्रांचा समावेश आहे. इटली दौऱ्यापूर्वी पंतप्रधान मोदी यांनी नॉर्वे, स्वेडन, नेदरलँडस आणि यूएई या देशांना भेट दिली होती.

## पश्चिम आशियातील तणावावर भारत सतर्क

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**रांची :** पश्चिम आशियात वाढत असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारताने संभाव्य परिणामांसाठी सज्ज राहणे आवश्यक असल्याचे मत केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री के राम मोहन नायडू यांनी व्यक्त केले. नागरी विमान वाहतुकीसह सर्व क्षेत्रांनी संभाव्य जोखमींचे मूल्यांकन करून अल्पकालीन, मध्यम मुदतीच्या आणि दीर्घकालीन रणनीती तयार करण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

रांची येथे पत्रकारांशी बोलताना नायडू म्हणाले की, सध्या परिस्थिती चिंताजनक नसली तरी सतर्क राहणे आवश्यक आहे. जागतिक अनिश्चिततेच्या काळात प्रत्येक क्षेत्राने संभाव्य परिणामांचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना आखल्या पाहिजेत.

वाढत्या इंधनदरांमुळे विमान भाडेवाढीची शक्यता व्यक्त होत असताना केंद्र सरकारने प्रवाशांना दिलासा देण्यासाठी काही महत्त्वाचे निर्णय घेतल्याचेही त्यांनी सांगितले. विमानतळांवरील लँडिंग आणि पार्किंग शुल्कात कपात करण्यात आली असून एव्हिएशन टर्बाइन फ्युएलवरील करही कमी करण्यात आला आहे. गेल्या आठवड्यात दिल्ली सरकारने एटीएफवरील मूल्यवर्धित कर २५ टक्क्यांवरून ७ टक्क्यांपर्यंत कमी केला होता.

देशांतर्गत विमान सेवांबाबत बोलताना मंत्री म्हणाले की, दररोज सुमारे पाच लाख प्रवासी देशांतर्गत मार्गांवर प्रवास करतात. विमान भाड्यांवर सरकार सातत्याने लक्ष ठेवून असून मागणी वाढल्यास अतिरिक्त विमाने आणि नवीन कनेक्टिव्हिटीची व्यवस्था केली जाईल.

दरम्यान, रांची विमानतळावर प्रवासी-केंद्रित विविध योजनांची घोषणा करताना नायडू यांनी सुधारित 'उडान २' योजना लवकरच सुरू होणार असल्याची माहिती दिली. सुमारे २९ हजार कोटी रुपयांच्या खर्चाच्या या योजनेअंतर्गत पुढील दशकात १०० नवीन विमानतळ आणि २०० हेलिपॅड विकसित करण्याचे उद्दिष्ट आहे.

## कान्हा व्याघ्र प्रकल्पातील वाघाचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भोपाळ :** मध्य प्रदेशातील कान्हा व्याघ्र प्रकल्पातील 'महावीर' नावाच्या नर वाघाचा मंगळवारी पहाटे मृत्यू झाला. गेल्या दोन-तीन दिवसांपासून वन विभागाच्या गस्त पथकाच्या देखरेखीखाली असलेल्या या वाघाच्या मृत्यूमागे 'कॅनाइन डिस्टेंपर' या जीवघेण्या विषाणूजन्य संसर्गाची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

प्राथमिक तपासात वाघाच्या फुफ्फुसांमध्ये गंभीर संसर्ग आढळून आला असून रक्त, ऊती आणि इतर नमुने न्यायवैद्यक तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. या चाचण्यांचा अंतिम अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

विशेष म्हणजे, जर या चाचण्यांमध्ये कॅनाइन डिस्टेंपर संसर्गाची पुष्टी झाली, तर गेल्या एका महिन्याच्या आत कान्हा व्याघ्र प्रकल्पात या संसर्गामुळे मृत्यू झालेला हा सहावा वाघ किंवा बछडा ठरणार आहे. यापूर्वी एका वाघिणीसह चार बछड्यांचा याच विषाणूमुळे मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले होते.

वन विभागाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत वाघाच्या शवविच्छेदनात फुफ्फुसांमध्ये तीव्र संसर्ग आणि शरीरावर काही जखमा आढळल्या. मात्र, दात, पंजे, मिशा आणि इतर महत्त्वाचे अवयव सुरक्षित असल्याने शिकारीचा कोणताही प्रकार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे नैसर्गिक संसर्गामुळेच मृत्यू झाल्याचा संशय अधिक बळावला आहे.

दरम्यान, गेल्या महिन्यात वाघीण आणि चार बछड्यांच्या मृत्यूनंतर वन विभाग आणि पशुसंवर्धन विभागाने संयुक्त मोहीम हाती घेतली होती. कान्हा व्याघ्र प्रकल्प परिसरातील सुमारे ९० गावांमध्ये हजारो पाळीव आणि भटक्या कुत्र्यांचे तसेच इतर जनावरांचे व्यापक लसीकरण करण्यात आले होते.

## 'वन नेशन, वन इलेक्शन'मुळे ७ लाख कोटी वाचतील

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**गांधीनगर :** लोकसभा आणि राज्य विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याच्या 'वन नेशन, वन इलेक्शन' संकल्पनेमुळे देशाचे तब्बल ७ लाख कोटी रुपये वाचू शकतात, असा मोठा दावा या प्रस्तावाचा अभ्यास करणाऱ्या संयुक्त संसदीय समितीचे अध्यक्ष पी. पी. चौधरी यांनी केला आहे. या बचतीमुळे देशाच्या विकासकामांना मोठी चालना मिळू शकते, तसेच देशाच्या सकल देशांतर्गत उत्पन्नात म्हणजेच जीडीपीमध्ये सुमारे १.६ टक्क्यांनी वाढ होण्याची शक्यताही त्यांनी व्यक्त केली.

'वन नेशन, वन इलेक्शन' प्रस्तावाचा अभ्यास करण्यासाठी स्थापन करण्यात आलेली संयुक्त संसदीय समिती सध्या विविध राज्यांचा दौरा करत आहे. गुजरात दौऱ्यादरम्यान गांधीनगर येथील गिफ्ट सिटी मध्ये समितीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला राज्याचे मुख्य सचिव, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, तसेच सत्ताधारी पक्षाचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत सतत होणाऱ्या निवडणुकांचा प्रशासन, अर्थव्यवस्था आणि विकास प्रक्रियेवर होणारा परिणाम याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीनंतर पत्रकार परिषदेत बोलताना चौधरी म्हणाले की, देशात जवळपास प्रत्येक वर्षी कुठे ना कुठे निवडणुका होत असतात. त्यामुळे प्रशासन यंत्रणा, सुरक्षा दल, शासकीय कर्मचारी आणि आर्थिक संसाधने मोठ्या प्रमाणावर निवडणूक प्रक्रियेत गुंतून पडतात. परिणामी विकासकामांवर परिणाम होतो. निवडणुकीदरम्यान लागू होणारी आचारसंहिताही अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांना विलंब लावते. त्यांच्या मते, सततच्या निवडणुकांमुळे उद्योग, पर्यटन, रोजगार, शिक्षण आणि सार्वजनिक सेवा यांनाही मोठा फटका बसतो. अनेकदा गुंतवणूक निर्णय पुढे ढकलले जातात, तर प्रशासनाचा मोठा वेळ निवडणूक व्यवस्थापनात खर्च होतो. त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारांची धोरणात्मक कामे प्रभावित होतात.

चौधरी यांनी सांगितले की, माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीने यासंदर्भात सुमारे १८ हजार पानांचा विस्तृत अहवाल तयार केला होता. या अहवालात लोकसभा आणि विधानसभांच्या निवडणुका एकत्र घेण्याची शिफारस करण्यात आली आहे. तसेच राष्ट्रीय आणि राज्य निवडणुकांनंतर १०० दिवसांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचाही प्रस्ताव मांडण्यात आला आहे.

## केदारनाथ मार्गावर भूस्खलन; यात्रेकरूंची सुटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**रुद्रप्रयाग :** राज्य आपत्ती प्रतिसाद दल (एसडीआरएफ) आणि राष्ट्रीय आपत्ती निवारण दल (एनडीआरएफ) यांच्या संयुक्त पथकांनी मंगळवारी रात्री झालेल्या भीषण भूस्खलनानंतर अडकलेल्या दहा हजारांहून अधिक यात्रेकरूंना सुरक्षित बाहेर काढण्यात यश मिळवले.

सोनप्रयाग ते गौरीकुंड दरम्यानच्या मुनकटिया सेक्टरमध्ये मुसळधार पावसानंतर मोठ्या प्रमाणात भूस्खलन झाले. यामुळे मुख्य रस्त्याचे मोठे नुकसान झाले आणि केदारनाथ मंदिर येथे दर्शनासाठी गेलेल्या तसेच परतणाऱ्या हजारो भाविकांचा संपर्क तुटला.

रुद्रप्रयाग जिल्हा नियंत्रण कक्षाला रात्री सुमारे ९.१५ वाजता घटनेची माहिती मिळाली. अंधार, मुसळधार पाऊस आणि कमी दृश्यमानता यामुळे परिस्थिती अधिक गंभीर बनली होती. रस्त्यावर कोसळलेल्या मोठ्या ढिगाऱ्यामुळे यात्रेकरूंमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. उपनिरीक्षक आशिष डिमरी यांच्या नेतृत्वाखाली एसडीआरएफचे पथक तातडीने घटनास्थळी रवाना झाले. तेथे पोहोचल्यानंतर त्यांनी एनडीआरएफच्या जवानांसोबत समन्वय साधत बचाव मोहीम सुरू केली. सततच्या पावसात आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही बचाव पथकांनी यात्रेकरूंना सुरक्षित मार्गदर्शन केले. गर्दी नियंत्रणात ठेवत वृद्ध, महिला आणि लहान मुलांना प्राधान्य देण्यात आले. या मोहिमेदरम्यान सुमारे १०,४५० यात्रेकरूंना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले.

मार्ग पुन्हा सुरू झाल्यानंतर केदारनाथ यात्रेकरूंची वाहतूक पूर्ववत झाली असली, तरी मान्सूनमुळे प्रवाशांनी सतर्क राहावे, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

## चीनबाबत सरकारची भूमिका शरणागतीची

# काँग्रेसचा केंद्रावर जोरदार हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** चीनविषयी केंद्र सरकारच्या धोरणावर काँग्रेसने पुन्हा एकदा तीव्र टीका करत मोदी सरकार "मोजूनमापून शरणागती पत्करण्याचे धोरण" राबवत असल्याचा आरोप केला आहे. काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी केंद्राच्या चीनविषयक भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत भारत-चीन संबंध, सीमावाद, व्यापार तूट आणि ग्रेट निकोबार प्रकल्पाच्या मुद्द्यावरून सरकारवर निशाणा साधला.



जयराम रमेश यांनी आरोप केला की, पर्यावरणीय कारणांमुळे ग्रेट निकोबार प्रकल्पाला विरोध करणाऱ्यांना "चीनसमर्थक" ठरवण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यांनी या भूमिकेला "दुटप्पीपणाचा कळस" असे संबोधले. त्यांच्या मते, सरकार विरोधी मत व्यक्त करणाऱ्यांवर राष्ट्रविरोधी ठपका ठेवण्याचा प्रयत्न करत आहे.

रमेश यांनी १९ जून २०२० रोजीच्या गलवान संघर्षाचाही उल्लेख केला. त्या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चीनला "क्लीन चिट" दिल्याचा आरोप करत त्यांनी म्हटले की, त्यामुळे सीमारेषेवर शहीद झालेल्या भारतीय जवानांचा अपमान झाला. तसेच चीनसोबत झालेल्या चर्चांमध्ये भारताने काही पारंपरिक गस्त हक्क आणि चराई हक्क गमावल्याचाही दावा त्यांनी केला.

काँग्रेसने भारत-चीन व्यापार तुटीच्या मुद्द्यावरूनही सरकारवर टीका केली. २०२५-२६ या आर्थिक वर्षात भारताचा चीनसोबतचा व्यापार तुटीचा आकडा सुमारे ११५ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचल्याचा दावा पक्षाने केला आहे. या वाढत्या व्यापार तुटीचा सर्वाधिक फटका भारतीय उद्योगांना, विशेषतः सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्राला बसत असल्याचे काँग्रेसचे म्हणणे आहे.

'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान पाकिस्तानला चीनने दिलेल्या कथित मदतीचाही काँग्रेसने उल्लेख केला. वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांनी चीन पाकिस्तानला नियोजन, निरीक्षण आणि अंमलबजावणीत मदत करत असल्याचे संकेत दिले होते, मात्र केंद्र सरकारने याबाबत कठोर भूमिका घेतली नसल्याचा आरोप रमेश यांनी केला.

ग्रेट निकोबार प्रकल्पाबाबत बोलताना काँग्रेसने हा प्रकल्प प्रामुख्याने व्यावसायिक स्वरूपाचा असल्याचे म्हटले आहे. अंदमान-निकोबार कमांडसाठी आवश्यक असलेल्या लष्करी पायाभूत सुविधांच्या विस्ताराकडे दुर्लक्ष होत असल्याचाही आरोप पक्षाने केला.

## इराण युद्धात अमेरिकेची ४२ विमाने बाधित

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वॉशिंग्टन :** इराणविरोधात २८ फेब्रुवारीपासून सुरू करण्यात आलेल्या 'ऑपरेशन एपिक फ्युरी'दरम्यान अमेरिकेची किमान ४२ विमाने नष्ट झाली किंवा त्यांचे मोठे नुकसान झाल्याचा धक्कादायक दावा अमेरिकेच्या काँग्रेशनल रिसर्च सर्व्हिस अर्थात सीआरएसच्या अधिकृत अहवालात करण्यात आला आहे. या अहवालामुळे अमेरिकेच्या पश्चिम आशियातील लष्करी मोहिमेच्या खर्च आणि परिणामांबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे.



सीआरएसने स्पष्ट केले आहे की, युद्धस्थिती, वर्गीकृत माहिती, सुरू असलेल्या कारवाया आणि विविध दाव्यांच्या पडताळणीमुळे नुकसानग्रस्त विमानांची संख्या पुढे बदलू शकते. तरीही आतापर्यंत उपलब्ध अधिकृत माहितीच्या आधारे हा प्राथमिक अहवाल तयार करण्यात आला आहे.

अहवालानुसार, अमेरिकेने या मोहिमेत अत्याधुनिक लढाऊ विमाने, हेलिकॉप्टर आणि ड्रोन मोठ्या प्रमाणावर गमावले आहेत. यात चार एफ-१५ई स्ट्राइक ईगल लढाऊ विमाने, एक एफ-३५ए लाइटनिंग-२ लढाऊ विमान, एक ए-१० थंडरबोल्ट-२ ग्राउंड अटॅक विमान, सात केसी-१३५ स्ट्रॅटोटँकर हवाई इंधन भरणारी विमाने आणि एक ई-३ सेंट्री एडब्ल्यूएसीएस विमानाचा समावेश आहे. याशिवाय दोन एमसी-१३०जे कमांडो-२ विशेष ऑपरेशन्स विमाने, एक एचएच-६०डब्ल्यू जॉली ग्रीन-२ हेलिकॉप्टर, २४ एमक्यू-९ रीपर ड्रोन आणि एक एमक्यू-४सी ट्रायटन ड्रोनही नष्ट झाले किंवा गंभीररीत्या बाधित झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

सीआरएसने म्हटले आहे की, हा डेटा अमेरिकेच्या संरक्षण विभाग आणि यूएस सेंटकॉमने प्रसिद्ध केलेल्या निवेदनांवर आणि अधिकृत अहवालांवर आधारित आहे. इराणमधील लष्करी मोहिमेच्या प्रचंड वाढत्या खर्चावर अमेरिकेत तीव्र चर्चा सुरू झाली आहे. १२ मे रोजी हाऊस अॅप्रोप्रिएशन उपसमितीसमोर झालेल्या सुनावणीत पेंटागॉनने या मोहिमेचा खर्च झपाट्याने वाढत असल्याचे मान्य केले.

### जातनिहाय गणनेविरोधातील याचिका फेटाळली

**नवी दिल्ली :** आगामी जनगणनेत जातनिहाय माहिती संकलनाला विरोध करणारी जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी फेटाळून लावली. जातनिहाय जनगणना करावी की नाही, हा पूर्णपणे सरकारच्या धोरणात्मक अधिकारक्षेत्रातील विषय असल्याचे स्पष्ट करत न्यायालयाने हस्तक्षेप करण्यास नकार दिला. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल पंचोली यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली.

## महिला वकिलांना सरकारी पॅनेलमध्ये आरक्षण द्यावे का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** सरकारी कायदेशीर पॅनेल आणि विधी अधिकारी नियुक्त्यांमध्ये महिला वकिलांना किमान ३० टक्के प्रतिनिधित्व देण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार, राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेशांना उत्तर मागवले आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल एम. पांचोली यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. वरिष्ठ वकील विकास सिंह यांनी याचिकाकर्त्यांच्या वतीने बाजू मांडल्यानंतर न्यायालयाने नोटीस जारी केली.

ही जनहित याचिका लाडली फाउंडेशन ट्रस्ट या संस्थेने दाखल केली आहे. यामध्ये सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालये, सरकारी विधी अधिकारी पदे, कायदेशीर मदत प्राधिकरणे तसेच केंद्र व राज्य सरकारांच्या विविध कायदेशीर पॅनेलमध्ये महिला वकिलांना किमान ३० टक्के प्रतिनिधित्व देण्याची मागणी करण्यात आली आहे. महिला विद्यार्थी विधी शिक्षण घेत असल्या तरी व्यावसायिक क्षेत्रात त्यांना अजूनही संरचनात्मक अडथळ्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे समान संधी आणि व्यावसायिक प्रगतीसाठी आरक्षणासारख्या उपाययोजना आवश्यक असल्याचे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे.

## खर्गेंच्या सूचनेकडे मुख्यमंत्र्यांचे दुर्लक्ष

# केरळ काँग्रेसमध्ये खातेवाटपावरून नाराजी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तिरुवनंतपुरम :** केरळमधील नव्या सरकारच्या खातेवाटपावरून काँग्रेसमध्ये अंतर्गत नाराजी उफाळून आली असून, मुख्यमंत्री व्ही. डी. सतीसन यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या सूचनेकडे दुर्लक्ष केल्याची माहिती समोर आली आहे. मागासवर्गीय आणि दलित समाजातील मंत्र्यांना महत्त्वाची खाती न दिल्याच्या मुद्द्यावरून पक्षांतर्गत वाद अधिक तीव्र झाला आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, शपथविधी सोहळ्यासाठी तिरुवनंतपुरममध्ये आलेल्या खर्गे यांनी खातेवाटपाचा प्रस्ताव पाहिल्यानंतर नाराजी व्यक्त केली. सामाजिक न्याय आणि सर्वसमावेशक प्रशासनाचा सातत्याने पुरस्कार करणाऱ्या काँग्रेसमध्येच मागासवर्गीय आणि अनुसूचित जातीच्या मंत्र्यांना दुय्यम खाती देण्यात आल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला होता. विशेषतः ए. पी. अनिल कुमार आणि एम. लिजू यांच्याकडून आरोग्य, देवस्वम आणि सहकार यांसारखी महत्त्वाची खाती काढून घेण्यात आल्याबाबत खर्गे यांनी आक्षेप नोंदविल्याचे सांगितले जात आहे. मात्र, मुख्यमंत्री सतीसन यांनी आपल्या निर्णयावर ठाम राहत या सूचनांना नकार दिल्याची माहिती काँग्रेसमधील वरिष्ठ नेत्यांनी दिली.



या वादामुळे मंत्र्यांची आणि विभागांची अंतिम यादी राज्यपालांकडे सादर करण्यात विलंब झाला असून खातेवाटपावर पुढील चर्चा सुरू असल्याचे समजते. काँग्रेस नेतृत्वाने या घडामोडींवर अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही.

मुस्लिम लीगला मत्स्यव्यवसाय आणि उच्च शिक्षण खाती देण्याच्या मुद्द्यावरूनही नव्या सरकारवर दबाव वाढला आहे. काही प्रभावशाली ख्रिश्चन चर्च संघटनांनी मुस्लिम लीगकडे ही खाती देण्यास विरोध दर्शविला आहे. लॅटिन कॅथोलिक चर्चने उच्च शिक्षण खात्याबाबत नाराजी व्यक्त करत काँग्रेसने ते खाते स्वतःकडे ठेवावे, अशी भूमिका घेतली आहे.

दुसरीकडे, काँग्रेस आणि मुस्लिम लीग यांच्यात पूर्वी झालेल्या समझोत्याचा आदर केला गेला नसल्याचा आरोप करत मुस्लिम लीगने उच्च शिक्षण खाते परत देण्याची मागणी केली आहे. काँग्रेसने रोजी एम. जॉन यांच्याकडे उच्च शिक्षण खाते सोपविण्याचा निर्णय घेतल्याचेही सांगितले जात आहे.

खातेवाटपावरून काँग्रेसमधील काही नेतेही नाराज असल्याचे समोर आले आहे. टी. सिद्दिकी यांना सुरुवातीला वन खाते देण्याचे ठरले होते; मात्र नंतर ते आरएसपीचे नेते शिबू बेबी जॉन यांच्याकडे देण्यात आले. तसेच एम. लिजू यांनाही केवळ उत्पादन शुल्क खाते मिळाल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केल्याचे समजते.

दरम्यान, सायरो-मलबार चर्चशी संबंधित कॅथोलिक काँग्रेस संघटनेने काँग्रेसने शिक्षण, वन आणि अल्पसंख्याक कल्याण ही महत्त्वाची खाती स्वतःकडेच ठेवावीत, अशी मागणी केली आहे. ख्रिश्चन समाजाने शिक्षण क्षेत्रात दिलेल्या योगदानाचा सन्मान राखला जावा, असेही संघटनेकडून म्हटले आहे.